॥ श्री ॥

# साईबाबांचा पोवाडा

(ले. प्रभाकर जामखेडकर, मुंबई ५१)

साईसूर्य प्रभा फाकली। धरा उजळली। लीला आगळी। शिरडीला
बाबा घेती अवतार। कलियुगी घडे मोठा चमत्कार। साईगुण
प्रभाकर गाणार ॥ धृ ॥

चाल: सोळाव वरिस धोक्याच। तुमच आमुच। पण संतांच।
सोळाव वरिस सोन्याच खास। दाखवले देऊ किती तुम्हास।
सोळाच्या ऐका चमत्कारास ॥

चाल: शंकराचार्यांच भाष्य सोळाव्या वर्षी ॥
ज्ञानदेव ज्ञानेश्वरी लिहिली सोळाव्या वर्षी ॥
शिवबा देई स्वराज्याचा मंत्र सोळाव्या वर्षी ॥
साईबाबा प्रथम प्रगटले सोळाव्या वर्षी ॥

चाल: गोर गोमट पोर सुंदर। निंबातळी स्थिर। तप खडतर।
लोक जाहले विस्मयाने चूर। पोर नसे थोराहूनी हा थोर।
योग्याच तेज मुखावर ॥
खंडोबाच येताची वार। विचारल वर। कोण हे पोर।
देवा खंडोबा आम्हाला सांग। निंबाखाली लागेल तयाचा
थांग। कुदळीचा घाला मिथेची घाव ॥

चाल: खोदता लागला तिथे विटांचा थर ॥
जात्याची तळी सारता दिसल भूयार ॥
चुनेगच्ची तळघरात समया जळती चार ॥
देव बोले बारा वर्ष तप केल घनघोर ॥
पोर म्हणे हेच तर माझ्या गुरूचे घर ॥
गुरुस्थान म्हणोनी बंद करा भुयार ॥
गुरुशुक्रवारी उद्र जाळा, सुख भरपूर ॥

चाल: गुप्त झाल पोर नंतर। वाहल वार। कोण धरणार।
शिरडीच भाग्य लई थोर। पाय पुण्याचे पुन्हा लागणार।
ऐकावा हाच आता चमत्कार ॥

चाल: चांद पटेल चुकलेला घोडा शोधी रानाला।
झाडाखाली बसलेला फकिर दिसे त्याजला।

"झुरका मार चिलमीचा मग लाग शोधाला"।
"शोधु द्या चुकलेला घोडा, घोडा बघतो दम धरा थोडा।
परेशान घोड्यासाठी पार झालो मी वेडा॥
'फकिर बोले त्यासाठी लांब कशाला जातो।
तुझा घोडा कुंपणाआड सुखाने चरतो'।
शोध घेता खरोखर घोडा तिथे सापडतो।
हा फाकिर कसला अवलिया, अवलिया गावला भला।
मती गुंग माझी, भाग्याचा 'घोडा' गवसला॥
चिलिम कशी पेटवावी, कशी भिजवावी छापी।
फकिरान दावला चमत्कार, स्तिमित मानसी।
चिमटा खूपसून मातीतून 'विस्तू' काढला वरती।
सटका मारता काढल पाणी, पाणी पिळून छापी गुंडाळी।
विस्मयाची चिलिम आता ओढू लागे चांदभाई॥
चांदभाईच वऱ्हाड लग्नाच आल शिरडीला।
तेजःपुंज गोरा पान बाल फकिर संगतीला।
तेजोनिधी रवी जणू भूलोकी प्रगटला।
खंडोबाच्या दर्शनास फकिर आला देवळाला।
म्हाळसापती करती पारख, हा हिरा लाखामधे एक।
'आवो साई' म्हणून आदरान केल स्वागत॥
'साई" किंवा "बाबा" नाम रूढ तेव्हापासून॥

चाल: केला मोडक्या मशीदीत वास। कुणी दिला त घेती घास॥
दिवसा इकडे तिकडे भटकत। मशीदीत काढती रात॥

चाल: फाटक तुटक अंगाभोवती।
मन मानेल तिथ बैसती।
वेड्यापरी चाळे चालती।
कितीजणा ठाव ब्रह्मांड गिळूनि असती॥

चाल: हा वेडा नाही फकीर। अवतारी थोर। करी चमत्कार।
वार्ता पसरली वाऱ्यावर। भ्रम लोकांचा झाला दूर।
घडल काय सांगतो तुम्हा सार॥

चाल: रोषणाई बाबांना प्यार। हर्ष होत मनाशी फार॥
हातामध्ये घेऊन टमरेल। स्वत: मागती वाण्याकडे तेल॥
तेवती पणत्या रातभर। उजळती मशीद मंदिर॥
रोज रोज काय करकट। वाण्यान केला मग कट॥
तेल मिळत काय फुकट। आज पासून बंद वाहिवाट॥

चाल:
बाबांना राग नाही आला।
नामी संधी गावली मला।
आपलस कराव याला।
परमार्थी लावावा लळा।
परतले द्वारकामाईला।
एकाग्र करूनि चित्ताला।
ताडकन् उठले त्यावेळा।
साऱ्या पणत्या केल्या मग गोळा।
वाती वळून त्यात सारल्या।
टमरेलात तेलाचा टिळा।
उपहासास कारण जो झाला।
मिसळूनी त्यात पाण्याला।
गटागट पिऊन उपहास उदरी पचविला॥

चाल:
पुन्हा घेती टमरेलात पाणी।
साऱ्या पणत्या पाण्यान भरती।
फट फजिती पाहू वेड्याची।
पेटती जवा त्या वाती।
पाण्याच्या पणत्या तेवती।
वेड्याची बघता ही सिध्दी।
तेली वाणी लागले पायाला क्षमा मागती॥
वितभर रुंदीची फळी।
चिंध्यांनी (आढ्यास) उंच बांधती।
चाऱ्ही बाजूस पणत्या तेवती।
तीवर शांत चित्त झोपती।
फळीवर कसे ते चढती।
पुन्हा खाली कसे उतरती।

फळी नजन पेलते कधी।
आश्चर्य सारे करताती।
पाळत किती लोक ~~कुरत~~ ठेवती।
कुणा नाही समजली गती।
जांभळीच्या हो फांदीवरती।
धौती करी वाळवी आतडी।
योगासिद्ध देहाची किती वर्णू मी महती ॥
बाबांची तऱ्हा सारी न्यारी।
दया क्षमा शांति अन्तरी।
महान काम बाबांच दीन दुबळ्यांना तारी॥

चाल: बाबा होते हिंदू की यवन। महामानव। ईश्वराच नाव।
राम-क्रिस्त-रहिम काही ध्याव। सर्व भूती एकच असे देव।
मानवच करी भेद भाव॥
धर्म पंथ जात पात आज। दूहीच बीज। बाबांच काज। द्वैत
विसरूनी एक व्हाव। सर्व धर्मात पाहि सम भाव।
भक्तिन देवरूप व्हाव॥

चाल: भारतीय परंपरा थोर।
उपनिषद हाच विचार।
संतांनी केला प्रचार।
दत्तपरंपराही थोर।
याच विशाल तत्त्वाचा बाबा करती आचार॥
सारे धर्म केले समन्वित।
सारे जग कुटुंबची एक।
राम-रहिम दोन्हीही एक।
जिवा-शिवाची घाली गाठ।
विसंगती बघा बाबांची कशी सुसंगत॥
द्वारकामाईत सदोदित वास।
माशीद असून धंदा हवी रवास।
राम नाम गजर सर्वांस।
सारी मानवजात एकात्म करीत सुसंगत॥

बाबा साक्षात्कारी परब्रह्म।
जनी नम्र हेच परब्रह्म।
अल्ला मालिक त्याचा मी बंदा सदा सांगत॥
सतत धुनी मशिदी म्होर।
विभूतिचा काय चमत्कार।
ब्रह्मांड गिळूनी ब्रह्मांड ग्रवढी थोर॥
हिंदु-मुसलमान धर्मांची।
एकी केली दोन प्रतिकांची।
कुणी नाही हिंदू यवन क्रांती ही साची॥
दया क्षमा शांती प्रेमाची।
शिकवणूक नित्य बाबांची।
अज्ञानाची कीव आमची।
मुंगी मापू शकेल का हिमालयाची उंची॥

चाल: थोरवी वर्णावी किती। साईनाथांची। दया प्रेमाची।भक्तांच्या
भल्याचाच नित ध्यास। चिंता वाहती बाबा हमखास।
संकटी नक्की येती साह्यास॥

चाल: तात्या कोते, बायजाबाई
अप्पा आणि म्हाळसापती।
शामा काशिराम शिंपी ही।
अभूतपूर्व सेवा बाबांची धन्य भक्तांची॥
एकदा काय झाला परकार।
धूनीत अग्नी घाले फूत्कार।
बाबा बसले होते सामोर।
झटकन् धरे हात आगीवर।
चटके बसती नाही फिकीर।
हात भाजती वेदना फार।
शामान खेचल बाबांना धूनीच्या पार॥
शामा पुसे बाबांना सार।
बाबांनी दिल उत्तर।
लोहारीण भक्त राहे दूर।
भट्टीत पडलं तिचं रे पोर।

हात घालून भट्टी मध्ये जीवे काढले वर ॥
अंतर्ज्ञानी बाबा लई थोर।
काशिराम करून बाजार।
जंगलातून फिरला माघार।
भिल्लांनी लुटल त्याला पार।
कुऱ्हाडीचा डोक्यावर वार।
वेदना होती अपार।
त्याच वेळी बाबांनी क्षोभ केला अनिवार ॥
संकटमुक्त कराया बाबा करती उपचार ॥

चाल: आधुनिक महिपती संत दासगणू, पुनित साईस्पर्शानि।
प्रयागक्षेत्री गंगा-यमुना, स्नान कराव मुहुर्तान ॥
वेड्या इतक्या लांब कशाला, प्रयाग आहे शिरडीत।
दृढ श्रध्दा हवी बाबा सांगला, चरणी ठेवी मस्तक ॥
पवित्र गंगा-यमुना झरती, साई चरणी अंगुष्ठी।
धन्य गुरू अन् धन्य शिष्य तो दासगणु जणु वैकुंठी ॥
हेमाडपंती कृपा जाहली, चरित्र काथीले साईचं।
सात दिसांचे करता पारायण, पुण्य जोडावे भक्तीचे ॥
उपासनी महाराज, दुजे बाबा जणू, थोर तयांचा अधिकार।
सत्त्वपरिक्षा कठोर करता, कृपा साईची त्यावर ॥
बुटी, खापर्डे, दिक्षीत, देशपांडे, नानासाहेब चांदोरकर।
शिष्यवरांची नाही गणती, सर्व धर्माचा परिवार ॥

चाल: लाखो भक्त लीन जाहले।
व्याधी रोगमुक्त जाहले।
श्रध्देचे चीज जाहले।
सापाचे विष उतरले।
गुरुदर्शन कृपा जाहले।
भक्तांच्या भल्यासाठी जीवन सारे वेचले ॥

चाल: विट एक उशाला घेत । निद्रिस्त द्वारकामाईत ॥
अंतर्मुख आत्मपरिक्षण । या विटेच्याच साक्षीने ॥
एका बालकाच्या हातून । **भंगली** खाली पडून ॥
ही तुटली नाही विट । आयुष्यास पडतसे तट ॥
जन्मभर होती संगत । पंचप्राण जणू भंगत ॥
बोलावणं आलं वरतून । बाबांना झाली जाण ॥
वाड्यात बुटींच्या न्यावे । शामास शब्द शेवटचे ॥
दसऱ्याचा साधुनी मुहूर्त । अनंतात विलीन ही ज्योत ॥

चाल: ग्रामज्योतिष्याच्या स्वप्नात ।
जाऊन देती त्यास दृष्टान्त ।
बापूसाहेब मेलो समजून ।
करणार नाही माझं पूजन ।
लाकडतोब याव उठून ।
यथासांग करा पूजन ।
अलौकिक तेजाचं **मामा** करती पूजन ॥
दासगणूस सांगती स्वप्नात ।
कोसळली मशीद शिरडीत ।
त्वरित याव निघून शिरडीस ।
वाहा बकुळ फुलांचा हार ।
तिथे माझ्या समाधीवर ।
प्रिय शिष्य दासगणू नाही पाहिला हार ॥
मुरलीधर स्थापण्यासाठी ।
जी जागा ठेवली राखूनि ।
बाबांनी निवडली जागा समाधीसाठी ।

चाल: शिरडी क्षेत्राची काय थोरवी, स्वर्ग जणू हा भूवरती ।
पाय लागता याच क्षेत्रावरी, अपाय साऱ्यांचे टळती ॥
नाशिक-त्र्यंबक काशी-बनारस, क्षेत्रे सारी ही शिरडीत ।
पंढरपुरचा विठ्ठल दिसला दासगणूसही शिरडीत ॥
रामकृष्ण आणि दत्तदिगंबर, सदासर्वदा शिरडीत ।
श्रद्धाभावाने दर्शन घेता, समाधी पावे शिरडीत ॥
समाधीतली हाडे बोलती, घ्यावी प्रचिती शिरडीत ।
परमतत्त्वाचा अनुभव घेण्या, अवश्य यावे शिरडीत ॥

गुरुपौर्णिमा, विजयादशमी, रामनवमी सण शिरडीत।
आनंद लुटण्या उन्मनतेचा, उत्सवास या शिरडीत॥

चाल: प्रत्यक्ष ईश प्रगटत। शिरडी क्षेत्रात। साई प्रख्यात।
कलीयुगी हाच घडे चमत्कार। द्वैत विसरूनि करा आचार।
साई धर्माचं जाणाव सार॥

मिळवणी: साईसूर्य प्रभा फाकली। धरा उजळली। लीला आगळी।
शिरडीला साई घेती अवतार। कलियुगी हाच घडे चमत्कार।
प्रभाकर साईगुण गाणार॥ धृ॥

विजयादशमी १९८२,

[signature]